दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ३७ शुक्रवार दि.०८ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## ट्रम्पच्या दुहेरी शुल्कामुळे बाजार हादरला ! सेन्सेक्स-निफ्टीमध्ये घसरण ; तज्ज्ञांचा इशारा



अमेरिकेने लादलेल्या २५ टक्के कर आणि अतिरिक्त २५ टक्के दंडात्मक करचा परिणाम आज भारतीय बाजारपेठेवर स्पष्टपणे दिसून येत आहे. २५ टक्के कर लागू करण्याचा पहिला टप्पा आजपासून लागू करण्यात आला आहे. आठवड्याच्या चौथ्या व्यापार दिवशी म्हणजेच आज सकाळी ९.३० वाजता, बीएसईवरील ३० शेअर्सचा सेन्सेक्स २५० अंकांनी घसरून ८०,४१२.९४ वर व्यवहार करत आहे. त्याच वेळी, एनएसईवरील निफ्टी ५० देखील कमकुवत होऊन २४,५०६.९५ च्या पातळीवर पोहोचला आहे.

नवीन करांमुळे बाजारात अनिश्चितता जागतिक व्यापार तणाव आणि अमेरिकेच्या या कर धोरणाचा गुंतवणूकदारांच्या भावनांवर नकारात्मक परिणाम झाला आहे, ज्यामुळे देशांतर्गत बाजारात विक्रीचा दबाव वाढला आहे. दरम्यान, अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतावर नवीन कर जाहीर केल्यानंतर दोन्ही देशांमधील व्यापार तणावामुळे सुरक्षित गुंतवणूक झाल्यामुळे गुरुवारी सोन्याची मागणी वाढली आहे.

स्पॉट गोल्ड ०.४ टक्क्यांनी वाढून ३,३८०.७६ प्रति औंस झाला. अमेरिकन गोल्ड फ्युचर्स ०.३ टक्क्यांनी वाढून ३,४४३.३० वर पोहोचले.

ब्रोकरेज फर्म जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे मुख्य गुंतवणूक धोरणकार डॉ. व्ही.के. विजय कुमार म्हणतात की चर्चेच्या कमी अपेक्षांमुळे अनिश्चितता लक्षणीयरीत्या वाढली आहे. तथापि, २५ टक्के कर लादण्यापूर्वी २१ दिवस दिल्याने निश्चितच चर्चेची काही शक्यता निर्माण झाली आहे. तरीही, व्यापार धोरणाबद्दल अनिश्चितता अजूनही कायम आहे.

ट्रम्पच्या कृतीचा बाजारावर परिणाम तर, मेहता इक्विटीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष (संशोधन) प्रशांत तपसे म्हणतात की ट्रम्प यांनी भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर जास्त कर आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांची मोठी विक्री, रुपयाच्या मूल्यात घसरण आणि निफ्टीची बिघडणारी स्थिती यामुळे दलाल स्ट्रीटवर मंदीचे वर्चस्व राहण्याची शक्यता आहे.

ते म्हणतात की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या वक्तृत्व आणि त्यांच्या कृतींचा नजीकच्या भविष्यात शेअर बाजारावर परिणाम होईल. तथापि, आतापर्यंत, ट्रम्प यांच्या वक्तृत्व आणि कृती असूनही, भारताची प्रतिक्रिया पूर्णपणे शांत आहे.

## रद्द झालेली जन्मप्रमाणपत्रे वापस जमा करणे बाबत लातूर महानगरपालिके आवाहन ...

लातूर :- शासनाने दिनांक ११ ऑगस्ट २०२३ पासून उशीरांनी नोंदणीबाबतच्या आदेशाविषयी २१ जानेवारी २०२५ च्या स्थगिती आदेशापर्यंत निर्गमित केलेल्या जन्म-मृत्यू प्रमाणपत्रापैकी जे प्रमाणपत्र तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जाचे अधिकारी अर्थात नायब तहसीलदार यांनी दिलेल्या देशाच्या आधारे निर्गमित करण्यात आले आहे ते आदेश व संबंधित प्रमाणपत्र रद्द केलेले आहेत. नायब तहसीलदार, लातूर यांचे स्वाक्षरीने एकूण १४७३ आदेश लातूर मनपास प्राप्त झाले होते व याप्रमाणे एकूण १४७३ विलंबाने नोंदीचे जन्मप्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. तसेच विलंबाने नोंदणीचे ११८ मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली होती. सदरील १४७३ जन्म-प्रमाणपत्रे रद्द करण्यात आलेली आहेत.

तरी ज्यांची जन्मप्रमाणपत्रे नायब तहसीलदार यांचे स्वाक्षरीने प्राप्त आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली आहेत अश्या नागरिकांनी त्यांची जन्मप्रमाणपत्रे जन्म-मृत्यू विभाग येथे वापस जमा करणे बाबत यापूर्वी आवाहन करण्यात आले होते. तसेच आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत घरोघरी जावून संपर्क करून याबाबत माहितीही देण्यात आलेली आहे. तथापि अद्यापपर्यंत १४७३ जन्म प्रमाणपत्रापैकी फक्त ३१९ नागरिकांनी त्यांची जन्म प्रमाणपत्रे वापस केलेली आहेत. तरी उर्वरित संबंधीत ११५४ नागरिकांनी त्यांची जन्म प्रमाणपत्रे रद्द झालेली आहेत याची नोंद घ्यावी व सदरील जन्मप्रमाणपत्रे जरी इतर कार्यालयात जमा केली असतील तरी ती वापस काढून घेवून जन्म-मृत्यू विभाग लातूर शहर महानगरपालिका येथे तात्काळ जमा करावीत व अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी व जन्म प्रमाणपत्रासाठी नव्याने अर्ज करावा असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीमुळे स्मार्ट व्हिलेज कव्हा येथील विविध विकास कामांचा शुभारंभ कार्यक्रम पुढे ढकलला

लातूर दि.०७/०८/२०२५ उत्तराखंड येथे कोसळलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाराष्ट्रातील जवळपास १५० नागरिक आपत्तीग्रस्त झाले असून या दूर्घटनेतील आपत्तीग्रस्ताच्या मदतीसाठी महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन खात्याचे मंत्री मा.ना.गिरीषजी महाजन साहेब हे तातडीने उत्तराखंड येथे रवाना झाले आहेत.

या आपत्तीबाबत मा.ना.गिरीषजी महाजन साहेब व मा.ना.शिवेंद्रराजे भोसले साहेब यांनी थेट दूरध्वनीवरून माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांच्याशी संपर्क साधून संवाद साधला व ना.गिरीष महाजन यांच्या जळगाव जिल्ह्यातील जवळपास ४५ नागरिक आपत्तीग्रस्त झाल्याने मा.मंत्री महोदय तातडीने आपत्तीग्रस्त भागात गेले आहेत. दरम्यान कव्हा येथील ०८ ऑगस्ट २०२५ च्या कार्यक्रमासाठी नैसर्गिक आपत्तीमुळे मान्यवरांना उपस्थित राहणे शक्य नाही. त्यामुळे कव्हा येथील ०८ ऑगस्ट २०२५ रोजी होणारा विभागीय क्रीडा संकुल इमारत भूमिपूजन व प्राथमिक आरोग्य केंद्राचा उद्घाटन व इतर कार्यक्रम तूर्तास पुढे ढकलण्यात आलेले आहेत. या कार्यक्रमाची पुढील तारीख लवकरच कळविण्यात येईल. असे ग्रामपंचायत कार्यालय कव्हा व संयोजकांच्यावतीने कळविण्यात आलेले आहे.

## युगंधर हौसिंग सोसायटीचा ग्रीन बेल्ट बळकावणाऱ्या सचिव - अध्यक्षांवर कठोर कार्यवाही व्हावी : प्रा.डॉ. शहेजादी शेख

लातूर : लातूर शहराच्या अंबाजोगाई रोड वरील आर्वी परिसरातील युगंधर हौसिंग सोसायटीचा साडेअकरा हजार फूटांपेक्षा अधिक असलेला ग्रीन बळकावून तो बेकायदेशिररित्या आर्वी ग्रामपंचायतच्या घशात घालण्याचा प्रयत्न करणारे सोसायटीचे अध्यक्ष डॉ. जालिंदर केकाण व बनावट सचिव अशोक बारीकराव पवार यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी या सोसायटीच्या सभासद तथा संविधान सेवा संघ महाराष्ट्रच्या संस्थापक अध्यक्षा प्रा. डॉ. शहेजादी शेख यांनी गुरुवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली.



लातूरच्या आर्वी परिसरात साधारणतः अडीच एकर जागेवर युगंधर हौसिंग सोसायटीची उभारणी करण्यात आली असून या सोसायटीत केवळ २४ सभासद आहेत. सोसायटीच्या मालकीचा किमान ११ हजार ८०० स्क्वेअर फुटांचा एक मोठा ग्रीन बेल्ट सोडण्यात आलेला आहे. कोणत्याही हौसिंग सोसायटीचा ग्रीन बेल्ट हा त्या सोसायटीच्या सभासदांच्या मालकीचा असतो. ग्रीन बेल्ट मुलांसाठी खेळाचे मैदान म्हणून तसेच मोकळी जागा म्हणून उपयोगात आणला जाणे आवश्यक असते. असे असताना स्वतःला युगंधर हौसिंग सोसायटीचा सचिव म्हणवून घेणारे अशोक पवार हे सोसायटीचे सभासदही नसताना त्यांनी हा ग्रीन बेल्ट आर्वी ग्रामपंचायतच्या घशात घालण्याचा कुटील डाव रचला असल्याचे सांगून प्रा.डॉ. शहेजादी शेख यांनी सदर ग्रीन बेल्टवर बेकायदा राम मंदिराची उभारणीही करण्यात आल्याचे नमूद केले. राम मंदिराला आपला विरोध नाही. आपण सर्वधर्म समभाव मानून चालण्याचे काम करतो. सोसायटीच्या स्वयंघोषित सचिवांनी व अध्यक्षांनी या जागेवर राम मंदिराच्या आडून आर्वी ग्रामपंचायतला अंगणवाडीचे बांधकाम करण्यास प्रवृत्त केले. याचाच अर्थ सचिवांनी बेकायदेशीरपणे सोसायटीच्या मालकीचा असलेला हा ग्रीन बेल्ट आर्वी ग्रामपंचायतच्या नावे करून दिला. आर्वी ग्रामपंचायतला त्या जागेचा आठ अ चा उताराही दिला गेला आहे. त्यामुळे आर्वी ग्रामपंचायतच्या हद्दीतील अनेक ग्रीन बेल्ट्स, पाणंद रस्ते, शेतरस्ते, खुल्या जागा अवैधरित्या बळकावण्यात आल्या आहेत , याचाही शोध घेणे आता आवश्यक बनल्याचे प्रा. डॉ. शेख यांनी सांगितले.

आपल्या सोसायटीची संरक्षक भिंत आर्वी ग्रामपंचायतने बेकायदेशीरपणे पाडून ग्रीन बेल्टवर अतिक्रमण केले. पाडण्यात आलेल्या संरक्षक भिंतीचे बांधकाम करत असताना सोसायटीच्या सचिवांनी या कायदेशीर बाबीला सोसायटीबाहेरचा बेकायदेशीर जमाव, ग्राम पंचायतचे सरपंच पप्पू उर्फ धनंजय देशमुख, माजी सरपंच विलास भोसले, उप सरपंच सचिन सूर्यवंशी, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय सानप व त्यांच्या पोलीस पथकासह विरोध दर्शवून बांधलेली संरक्षक भिंत पुन्हा एकदा पाडली. त्यावेळी एपीआय सानप यांनी तेथे उपस्थित जमावाला चिथावणी देऊन आपल्यावर जमावाकडून हल्ला ( मॉब लिंचिंग ) करण्यास प्रवृत्त केल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी जमावाने आपल्या गाडीवर दगडफेक करून गाडीचे नुकसान केले. गाडीवर हल्ला होताच आपण स्वसंरक्षणार्थ तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी राधिका पाटील नावाची महिला गाडी अडवण्याचा उद्देशाने गाडीसमोर येऊन उभी राहिली. आपण त्या महिलेच्या बाजूने गाडी काढून तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला, त्याला काही मंडळींनी आपण त्या महिलेला जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याचा बनाव केला व आपल्याविरुद्ध खोटा गुन्हा नोंद केला. या प्रकरणी आपण पोलिसांना वास्तव कथन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याची दखल व तक्रार घेतली नाही. हे संपूर्ण प्रकरण केवळ सोसायटीचा ग्रीन बेल्ट बळकावण्याचा प्रयत्न असल्याने आपण सामाजिक बाब म्हणून हा लढा देत आहोत. मात्र, त्याला काही मंडळींकडून धार्मिकतेचा रंग देण्याचा अयशवी प्रयत्न केला गेल्याचे प्रा. डॉ. शेख यांनी सांगितले. या हौसिंग सोसायटीची नोंदणी १९९९ ला झाली. तेव्हापासून २०२३ पर्यंत सोसायटीचे सर्व सभासद एक परिवार या नात्याने गुण्यागोविंदाने राहत होते. परंतु सचिव अशोक पवार व अध्यक्ष डॉ. केकाण हे दोघे मूलतः बीडचे. ते सोसायटीत जेव्हा राहायला आले तेव्हापासून सोसायटीत वादाला सुरुवात झाल्याचेही प्रा. डॉ. शहेजादी शेख यांनी सांगितले. यावेळी संविधान सेवा संघाचे उपाध्यक्ष ॲड. गोविंद सिरसाठ यांनी या प्रकरणाची कायदेशीर बाजू विस्तृतपणे विशद केली.

## अंबाजोगाई येथे पासपोर्ट सेवा केंद्र स्थापनेची खा. सोनवणेंची केंद्रीय दळणवळण मंत्र्यांकडे मागणी

केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापनेची मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली आहे.

अंबाजोगाई ही शैक्षणिक, आरोग्य, प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्वाची आणि बीड जिल्ह्यातील प्रमुख नगरी आहे. तर जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापन करणे गरजेचे आहे. हे केंद्र स्थापन झाल्यास अंबाजोगाईसह केज, धारूर, परळी, माजलगाव या भागातील लोकांना देखील याचा लाभ होणार आहे. या मागणीचे निवेदन खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची दिल्ली येथे भेट घेऊन सादर केले. तर या आपल्या पाठपुराव्यातून लवकरच ही सुविधा अंबाजोगाईत सुरु होईल, अशी खात्री ही खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.






## हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र ही चळवळ केज शहरातील विविध ठिकाणी व्रक्षरोपण करून संपन्न

केज/प्रतिनिधी केज नगरपंचायतच्या माध्यमातून सहा हजार वृक्ष लागवड करण्याचे उद्दीष्ट केज नगर पंचायतच्या वतीने पूर्ण करून विविध संस्थेच्या माध्यमातून दहा हजार वृक्ष लागवड करण्याचे आमचे ध्येय असून यापूर्वी आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ५५०० वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने युवा तरूण,सामाजिक,कार्यकर्ते व विद्यार्थी,महिला वर्ग प्रशासनातील अधिकारी व ग्रामस्थांनी सहभाग घेतला असुन यावेळी केज नगरपंचायत हद्दीत आम्ही केलेले वृक्षारोपण हे कायमस्वरूपी वृक्ष लागवड व जोपासना करण्याचा आमचा मानस आहे यानंतर आम्ही रोडच्या मध्यभागी पिंपळ ,वड ,चिंच,यासारखे मोठे २ हजार झाडे लावणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार पक्षाचे ज्येष्ठ हारुणभाई इनामदार यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले. यावेळी केज नगरीच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांनी म्हटले की,आम्ही लावलेले वक्ष लागवड याची जोपासना करण्याची ही जबाबदारी आम्ही प्रत्येक व्यक्ती व संस्थेकडे दिलेले आहे व ती दिलेली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडतील व यावेळी केलेले वृक्षारोपण हे जीवनदायी आरोग्यासाठी प्रेरणा देणारा उपक्रम आहे असे मत बोलताना सौ. बनसोड यांनी व्यक्त केले.



यावेळी केज तहसील चे तहसीलदार राकेश गिड्डे, केज नगरपंचायत चे मुख्याधिकारी अजित ढोपे, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नायब तहसीलदार अशोक भंडारे, पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे,पेशकर नन्नवरे, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेविका सौ.पद्मिनी आक्का शिंदे यांच्यासह नगरसेवक, नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी, सर्व कार्यालयाचे अधिकारी,कर्मचारी व बचत गटाच्या महिला आणि नागरिकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## तेलापलीकडचा संदेश


नव्या शतकातील जागतिक घडामोडींकडे पाहताना हे स्पष्टपणे जाणवते की, सामर्थ्य आणि स्वायत्ततेची लढाई आता केवळ रणांगणावर लढली जात नाही, तर ती आर्थिक, राजनैतिक आणि धोरणात्मक पातळीवर लढली जाते. कुठल्याही एका महाशक्तीच्या अधीन राहून धोरणे ठरविण्याचे दिवस आता मागे पडले आहेत. आजच्या जागतिक व्यवस्थेत स्वतंत्र भूमिका अधोरेखित करणे आणि ती प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणे, हीच खरी स्वायत्ततेची कसोटी आहे.

सध्या सुरू असलेल्या व्यापार तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका एक गुंतागुंतीच्या परराष्ट्र धोरणात्मक नात्याच्या टप्प्यावर आहेत. एकतर्फी वर्चस्वापासून मुक्त असणार्या बहुध-ुवीय जागतिक व्यवस्थेचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय भारताच्या स्वायत्त, स्वतंत्र धोरणांचे समर्थन करत आहे. अमेरिकेच्या टॅरिफ दडपशाहीसमोर भारताने झुकण्यास नकार देत आर्थिक आणि धोरणात्मक स्वायत्तता टिकवून ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या संपूर्ण संघर्षाचा केंद्रबिंदू केवळ स्वस्त रशियन तेल नाही, तर भारताच्या भविष्यातील जागतिक स्थानाचा आणि स्वाभिमानाचा प्रश्न आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर २५ टक्के टॅरिफची घोषणा करताना रशियाकडून तेल आयातीबाबत दंड आकारण्याची गर्जनाही केली आहे. या कृतीचा उद्देश भारताला झुकवणे हाच होता; पण त्याचा परिणाम उलटा होण्याची शक्यता आहे. भारताने या दबावाला शरण न जाता नवी जागतिक महत्त्वाकांक्षा ठामपणे मांडली आहे. रशियाच्या युद्धामुळे युक्रेनमध्ये किती लोक मरत आहेत, याची फिकीर भारत करत नाही, या ट्रम्प यांच्या आरोपावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने दिलेली प्रतिक्रिया सार्थ आहे. भारताने पश्चिमी राष्ट्रांच्या ढोंगी वागणुकीचा या माध्यमातून नव्याने पर्दाफाश केला आहे. ज्या पद्धतीने अमेरिका आणि युरोपियन युनियन रशियाशी अजूनही व्यापार करत आहेत, त्याच पद्धतीने भारतही राष्ट्रीय हित आणि आर्थिक सुरक्षा लक्षात घेऊन पावले उचलणार आहे, हे स्पष्ट सांगण्यात आले. या उत्तराच्या पुढे जाऊन भारतीय परराष्ट्र धोरणाची पुढील दिशाही आता स्पष्ट केली आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दिल्लीत पार पडलेल्या बिम्सटेक गटाच्या एका कार्यक्रमादरम्यान बोलताना असे म्हटले आहे की, जागतिक रचना ही मूठभरांच्या प्रभुत्वाखाली न राहता ती निष्पक्ष व सर्वसमावेशक असावी, अशी भारताची सामूहिक इच्छा आहे.

भारताच्या दृष्टिकोनात स्पष्टपणे दिसून येते की, भविष्यात कोणत्याही महाशक्तीने जागतिक निर्णयांवर एकाधिकार ठेवता कामा नयेत. भारताला अशा जागतिक रचनेचा पाठिंबा आहे, जिथे विविध राष्ट्रांना स्वतंत्रपणे भूमिका बजावण्याची आणि निर्णय घेण्याची संधी मिळेल. बहुध-ुवीय जागतिक व्यवस्था हा मुद्दा भारतीय परराष्ट्र धोरणात नवीन नाही; पण सध्याच्या दबावाच्या पार्श्वभूमीवर त्याचा पुन्हा पुन्हा ठाम उच्चार होणे हे संकेतात्मक आहे. भारत या संघर्षाला केवळ आर्थिक टप्पा न समजता जागतिक सत्तेच्या नव्या विभागणीची चाचणी मानत आहे. इथे केवळ व्यापार तूट वा टॅरिफवाद नाही, तर रास्त व मूलभूत प्रश्न आहे, तो म्हणजे जागतिक नियम कोण ठरवणार? भारतासारख्या उदयोन्मुख शक्तींनी अजूनही पश्चिमी चौकटीत राहावे का, की त्या चौकटी बदलाव्यात? या संपूर्ण संघर्षामध्ये भारत एक संदेश देत आहे, तो म्हणजे नव्या विश्वरचनेमध्ये भारत हा केवळ सदस्य नसेल, तर शिल्पकार असेल. अशा जगात आर्थिक, राजकीय आणि नैतिक दृष्ट्या अमेरिका, युरोप, चीन, रशिया यांच्याइतकेच भारताचेही वजन असेल.

# संघर्षातून निर्माण झालेला दीपस्तंभ

पुस्तक परीक्षण : वादळाशी झुंजताना – एक हृदयस्पर्शी संघर्षकथा श्रीमती श्री. नवेकर (आर्य) लिखित वादळाशी झुंजताना हे आत्मकथन केवळ एका स्त्रीच्या वैयक्तिक अनुभवांचे चित्रण नाही, तर ते एक सामाजिक, वैद्यकीय, मानसिक आणि आर्थिक पातळीवर चाललेल्या झुंजीचे व्यापक प्रतिबिंब आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत आलेल्या महामारीच्या भीषण काळात, एका सामान्य मध्यमवर्गीय स्त्रीने आपल्या पतीच्या गंभीर आजाराशी दिलेला लढा, त्यातील तिचा संयम, समर्पण, विवेक आणि श्रद्धा यांचे जे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण या पुस्तकात सापडते, ते वाचकांच्या मनावर खोल परिणाम करते. पुस्तकाची भाषा जरी अतिशय साधी आणि सरळ असली, तरी त्यातील प्रत्येक वाक्यातून प्रामाणिक भावना, प्रत्यक्ष अनुभवांची खोली आणि आत्ममंथनाची तीव्रता ठळकपणे जाणवते. या अनुभव कथनात लेखिकेने तिन्ही स्तरांवर झुंज दिली; शारीरिक, मानसिक आणि आर्थिक. तिच्या पतीला आलेला कॅन्सर, त्याच्या उपचारांतील अडचणी, औषधांचा तुटवडा, रुग्णालयातील अव्यवस्था, आणि या साऱ्याशी तिने एका शिक्षिकेच्या आणि पत्नीच्या भूमिकेतून दिलेला लढा हा केवळ प्रेरणादायीच नाही, तर व्यवस्थेतील त्रुटींवरही भाष्य करणारा ठरतो. ती स्वतः एक शिक्षक असून, शिक्षणाचा आधार घेऊन ती केवळ वैद्यकीय माहिती समजून घेत नाही, तर डॉक्टरांशी संवाद साधून निर्णय घेण्याचा आत्मविश्वासही दाखवते. केमोथेरपी, चठ्ख, झएढ–ड्लरप, ॠश्वषळींळपळल यासारख्या औषधोपचारांची माहिती घेऊन ती आपल्या पतीसाठी योग्य निर्णय घेत राहते. हे करत असताना तिच्यातले फायटर केअरगिव्हरचे रूप प्रकर्षाने समोर येते. पुस्तकातील एक मोठी जमेची बाजू म्हणजे, या संपूर्ण वैयक्तिक प्रवासाचे लेखिकेने अतिशय संयमी भाषेत केलेले आत्मचिंतन. ती कुठेही तक्रार करत नाही. ती कोणालाही दोष देत नाही. उलट, नियतीने तिच्यावर लादलेल्या या अकल्पनीय संकटालाही ती एक अनुभव, एक शाळा मानते. ती म्हणते, कॅन्सरच्या शाळेत प्रवेश घेतला. या वाक्यातून दिसणारी तिची मानसिकता किती परिपक्व आणि धैर्यशील आहे, हे लक्षात येते. ती या आजाराशी वैयक्तिक रित्या झुंज देत असताना, तिच्या पतीचे आत्मविश्वास देखील आपल्याला दिसतो कारण तो स्वतः ड्रायव्हिंग करून रुग्णालयात जातो, उपचार सहन करतो आणि कुठेही हार मानत नाही. हे दोघांचे नातं म्हणजे केवळ पती–पत्नीचे संबंध नाहीत, तर एक जीवनभर टिकणारी मैत्री, विश्वास आणि समर्पणाचे मूर्त स्वरूप आहे. कोरोनाच्या काळात देशभरातच आरोग्यव्यवस्थेचे धिंडवडे निघाले होते. त्यातच या कुटुंबाला आलेले संकट म्हणजे वैयक्तिक दुःखाला सामाजिक अपुऱ्यांची भर. लॉकडाऊन, रेमडेसिव्हर इंजेक्शनचा तुटवडा, वैद्यकीय सुविधा अपुऱ्या, हॉस्पिटलमधील अपारदर्शकता या साऱ्याशी लेखिकेचा सामना होत राहतो. पण ती हार मानत नाही. ती मदतीची याचना करते, पण ती विनंती करणे हे तिच्या स्वाभिमानाला बाधक होत नाही, कारण ती त्याला पतीच्या जीवनासाठीची शेवटची आशा मानते. पगार असूनही खर्च पूर्ण न होणे, सहकाऱ्यांकडून, मित्रांकडून पैसे घेणे आणि वेळेवर परत करणे या सगळ्यातून तिच्या प्रामाणिकपणाची आणि जबाबदारीची प्रचिती येते. लेखिकेच्या आयुष्यातील एक अत्यंत हृदयद्रावक क्षण म्हणजे लग्नाचा वाढदिवस. पूर्वी हसतमुख साजरा होणारा हा दिवस आता हॉस्पिटलमध्ये, श्वासोच्छ्वासासाठी संघर्ष करणाऱ्या पतीसोबत शांततेत साजरा करावा लागतो. कधी असाही लग्नाचा वाढदिवस साजरा करण्याची वेळ येईल याची कल्पना नव्हती... हे वाक्य केवळ दुःखद नाही, तर ते नियतीच्या क्रौर्याचं दर्शन घडवतं. या वेळी तिच्या भावना केवळ एका पत्नीच्या नसतात, तर त्या एका सख्याच्या, एका मैत्रिणीच्या आणि एका संपूर्ण आयुष्याच्या सहकारीच्या भावना असतात. लेखिकेने पुस्तकात वारंवार नियतीचा उल्लेख केला आहे. कोणतीही अंधश्रद्धा न ठेवता, ती नियतीकडे एका अदृश्य नियोजनकर्त्याच्या रूपात पाहते. कार घेतल्यावर लॉकडाऊन लागणं, पाठदुखीने सुरू झालेली गोष्ट नंतर कॅन्सरमध्ये बदलणं, आणि अशा अनेक घटनांमध्ये तिला नियतीच्या आस्तित्वाची जाण होते. या दृष्टिकोनातून ती दुःखाकडे पाहण्याचा एक नवा मार्ग शोधते. ती दुःखाला स्वीकारते, त्यातून शिकते आणि त्याचा अर्थ लावते. हे तत्त्वज्ञान वाचकाला अंतर्मुख करतं. या अनुभवकथनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिचं कुटुंब. मुलगा, सासर–माहेर, आणि इतर नातेवाईक यांचं मोलाचं सहकार्य लेखिकेला मानसिक आधार देतं. मुंबई, पुणे, लातूर या ठिकाणी सतत प्रवास करत, रिपोर्ट्स समजून घेत, डॉक्टरांशी संपर्क ठेवत, वेळेवर औषधे मिळवून देत, लेखिका एकाच वेळी सहचारी, पालक, केअरगिव्हर, व्यवस्थापक आणि प्रेमाचा स्रोत बनते. हे करताना ती कोठेही आत्मप्रशंसा करत नाही, उलट ती हे सगळं कर्तव्य म्हणून नव्हे, तर प्रेमातून केलं जातं, असं सांगते. पुस्तकाच्या शेवटाकडे जाताना लेखिकेचा सूर अधिक आत्ममंथनशील होतो. पतीच्या मृत्यूनंतरची शांतता, त्यांची आठवण, आणि तीव्र वेदना – या सगळ्यांचं विलक्षण संयमी आणि तरीही भावनाप्रधान वर्णन ती करते. ती म्हणते, खरी संपत्ती म्हणजे एकमेकांबद्दलचा समरसभाव आणि नात्यांतली शुद्धता. ही भावना तिच्या संपूर्ण अनुभवाच्या सारांशाप्रमाणे आहे. ती दुःखातूनही शिकते, आणि त्या अनुभवाला ती एक 'प्रकाशस्तंभ' समजते, ज्याने भविष्यात इतरांसाठी मार्गदर्शन व्हावं, ही तिची इच्छा आहे. या अनुभवातून एक सामाजिक संदेश स्पष्ट होतो, की वैद्यकीय चाचण्या वेळेवर करणे किती महत्त्वाचे आहे. पाठदुखीसारख्या सामान्य वाटणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे कधी कधी जीवघेणे ठरू शकते. हे अनुभव शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि डॉक्टरांसाठी शिकवणूक ठरू शकतात. विशेषतः शालेय शिक्षकांनी ही कहाणी विद्यार्थ्यांना वाचायला द्यावी, जेणेकरून त्यांना सहानुभूती, धैर्य, आणि जबाबदारी यांचा खरा अर्थ समजेल. तसेच, वैद्यकीय व्यावसायिकांनी रुग्णाच्या नातेवाईकांच्या मनोभावनांचा विचार करावा, हीदेखील एक मौल्यवान शिकवण आहे. एकंदरीत हा अनुभव केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण समाजातील अशा कित्येक संघर्षांचा प्रतिनिधी आहे. 'वादळाशी झुंजताना' हे पुस्तक वाचताना वाचक केवळ एका स्त्रीच्या दुःखकथेचा साक्षीदार राहत नाही, तर तो स्वतःला, आपली नाती, आपली नोकरी, आरोग्य, कुटुंब, या साऱ्या गोष्टींचा नव्याने विचार करू लागतो. प्रत्येक पानावरून व्यक्तीगत दुःखाचे सामूहिक सत्य झळकते आणि त्यामुळे ही कहाणी एका कुटुंबापुरती मर्यादित राहत नाही. शिक्षक वर्गासाठी हे पुस्तक एक अमूल्य साधन ठरू शकते, कारण विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासच नव्हे, तर मानवी मूल्ये, संवेदनशीलता आणि समजूतदारपणा शिकवताना अशा वास्तववादी अनुभवांची अत्यंत आवश्यकता असते. पालकांसाठीही हे लेखन एक प्रकाशवाट आहे, संकटात स्वतःचा तोल न ढळता, शांत राहून कुटुंबाला आधार कसा द्यावा, याचे अत्यंत वास्तवदर्शी मार्गदर्शन येथे सापडते. विद्यार्थ्यांसाठी तर ही कहाणी मानसिक ताकद, सहनशीलता आणि जबाबदारी यांचे मूर्त रूप बनून उभी राहते. जीवनातील संघर्ष ही अपवादात्मक घटना नसून, अपरिहार्य प्रक्रिया आहे, हे ते शिकतात. आणि वैद्यकीय व्यावसायिकांसाठी, हे पुस्तक एक स्मरणपत्र आहे, की प्रत्येक रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भावनांचा, आशा–आकांक्षांचा, भीतींचा आणिश्रद्धेचा सन्मान राखणं ही त्यांच्या सेवेची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे हे पुस्तक समाजातील प्रत्येक घटकासाठी एक आरसा ठरतो, जो केवळ वास्तव दाखवत नाही, तर आपल्याला अधिक माणूस बनवतो. वादळाशी झुंजताना हे पुस्तक केवळ एका व्यक्तीच्या दुःखाची गोष्ट नाही, तर ती एका संपूर्ण समाजाच्या भावनिक आणि मानसिक संघर्षाची कथा आहे. लेखिकेचा अनुभव आज अनेक कुटुंबांना प्रेरणा देऊ शकतो कारण हा अनुभव अजूनही समाजात अनेक पातळ्यांवर जिवंत आहे. तो अनुभव केवळ स्मरणरूपात नाही, तर शिकवण देणाऱ्या दीपस्तंभासारखा आहे.




हे पुस्तक सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे, कारण यातून मिळणारी आशा, प्रेरणा आणि धैर्य यांची नितांत गरज आजच्या काळात अधिक जाणवते. वादळाशी झुंजताना हे पुस्तक म्हणजे एका धैर्यशील, समजूतदार, कणखर आणि भावनिकदृष्ट्या प्रगल्भ स्त्रीची यशोगाथा आहे, जिच्या संघर्षाला सलाम करावा तितका थोडाच आहे.

**********–

प्राचार्य डॉ. बालाजी रंगनाथराव लाहोरकर,
श्रीमती सिंधुताई जाधव महाविद्यालय,
मेहकर जिल्हा बुलडाणा,
मोबाईल ९८८१३६१४६९

# 'चले जाव' घोषणांनी ब्रिटीशही थरकापला : ऑगस्ट क्रांती दिन

आत्मक्लेश करणारी व्यक्ती क्रांतिकारक अशी व्यक्ती असते. क्रांतिकारक हा शब्द विशेषण म्हणून वापरला जाऊ शकतो; समाजावर किंवा मानवाच्या काही पैलूंवर मोठा प्रभाव पडतो, कारण त्याला सर्वस्वी ठरविले जाते. 'क्रांतीकारी' याचा अर्थ असा क्रांतिकारी आहे जो एखाद्या व्यवस्थेविरुद्ध बंड करतो किंवा अन्याय, हिंसा किंवा काहीतरी चुकीचे आणि अस्वीकार्य अशा निर्णयाविरुद्ध बंड करतो. क्रांतीकारी ही अशी व्यक्ती आहे जी एकतर विद्रोह करते किंवा सद्य परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी त्याचे समर्थन करते. या ऐतिहासिक 'चले जाव' आंदोलनात ८ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर 'वंदे मातरम्' हे प्रेरणादायी, वंदनीय गीत संपूर्ण कडव्यांसहीत संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर उर्फ मास्तर कृष्णराव यांनी झिंझोटी रागात तयार केलेल्या स्वकृत चालीत गाऊन सादर केले. यावेळी पेटून उठलेल्या भव्य जनसमुदायासमोर हे तेजस्वी गीत गाण्यासाठी प्रसिद्ध गायक व कट्टर देशभक्त असलेल्या मास्तर कृष्णरावांचीच निवड करण्यात आली होती. या गीतावर इंग्रजांनी बंदी घातलेली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या गीताचे संपूर्ण कडव्यांसहित जाहीर गायन करणे हे फार मोठे धाडस होते.

या आंदोलनात जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली. देशभरात ९ लाख लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये इंग्लंड सत्ता बदल होऊन मेजर क्लमेंट टली यांच्या नेतृत्वाखाली त्रिमंत्री योजना सुरुवातीपासून भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अनुकूल होती. मार्च १९४७ मध्ये पार्लमेंटमध्ये बोलतांना मेजर क्लमेंट टली याने भारताविषयी धोरण स्पष्ट केले. इंग्लंड लवकरच भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करेल व त्यासंबंधी वाटाघाटी करण्याकरिता भारतात त्रिमंत्री कमिशन पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. मेजर टली यांच्या घोषणेनुसार २४ मार्च १९४७ रोजी त्रिमंत्री कमिशन भारतात आले. स्ट्रॅफर्ड क्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स व अलेक्झांडर हे तीन सभासद होते. या त्रिमंत्री कमिशनने राष्ट्रीय काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणी करून एक योजना मांडली, ही योजना म्हणेजच त्रिमंत्री योजना होय. भारत छोडो आंदोलन किंवा ऑगस्ट क्रांती हे ऑगस्ट १९४२ मध्ये संपूर्ण स्वराज्यासाठी सुरू झालेले नागरी असहकार आंदोलन चले जाव चळवळ होते. गांधीजींच्या करा किंवा मरा ह्या संदेशाने या आंदोलनाची सुरुवात झाली होती. मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी भारत छोडोचा नारा देऊन ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र प्राप्तीसाठी आंदोलन उभारले होते. महात्मा गांधीजीसह काँगेस श्रेष्ठींना ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाचा एक भाग म्हणून अटक करण्यात आली होती. या आंदोलनाचा गुप्त मसुदा सेवाग्राम येथे ९ जुलै रोजी बापुकुटीतील आदी निवासात तयार करण्यात आला होता आणि १५ जुलै रोजी काँग्रेस कार्य समितीतर्फे त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले होते. त्या मसुद्याला पुढे वर्धा ठराव म्हणून मान्यता देण्यात आली आणि ९ जुलै २०१८ रोजी चले जाव चळवळीचा ७५ वा वर्धापन दिन संपन्न झाला. १९४२ साली याच तारखेला महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना चले जावचा आदेश दिला आणि त्या आदेशाने भारतातली जनता पेटून उठली. तिने उत्स्फूर्तपणे गावागावात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. ह्या आन्दोलनाचे प्रतिसाद शहरी भागासह ग्रामीण भागातही पसरले. तत्कालीन ग्रामीण भागातील अग्रनी कार्यकर्ते असणारे बुलडाणा जिल्ह्यातील, नागझरी गावचे रखमाजी कायंदे (सावकार) यांनी शेकडो कार्यकर्ते आपल्या स्वखर्चाने मुंबईला आंदोलनात सहभागी केले होते. सेवाग्राम येथे झालेल्या या मसुदा बैठकीत जनआंदोलनाचे नियम, आंदोलन पुढे नेण्याचे सर्व अधिकार महात्मा गांधींकडे देण्यात येत असल्याचे यावेळी ठरविण्यात आले होते.

त्यानंतर २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन भारतात आले. भारतात आल्याबरोबर निरनिराळ्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी फाळणीची योजना तयार केली. ३ जून १९४७ रोजी ही योजना प्रसिद्ध करण्यात आली. मुस्लिम लीग व राष्ट्रीय काँग्रेसने या योजनेला मान्यता दिल्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने यांवर ठराव पास केला. ब्रिटिश पार्लमेंटने पास केलेल्या भारताविषयीचा हा ठराव म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा होय. अशा रितीने स्वातंत्र्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हा स्वतंत्र झाला. भारताच्या इतिहासात ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. भारत छोडो आंदोलन ही भारताच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील एक महत्त्वाची घटना आहे आणि दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी भारत छोडो आंदोलन दिन म्हणून पण साजरा केला जातो. हा दिवस १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटीश राजवटीच्या विरोधात जन आंदोलन सुरू केला होता. आजदिनी ८३ व्या ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शुभेच्छा !

************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# 'निपुण'चा प्रयत्न उद्दिष्टपूर्तीकडे जाणार कसा ?

आपल्या खंडप्राय देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा विस्तार २४.८ कोटी विद्यार्थी, १४.७२ लाख शाळा आणि ९८ लाख शिक्षक, असा असल्याचे २०२४–२५ ची आर्थिक पाहणी सांगते. या व्यवस्थेला आकार देण्याचे काम नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे (२०२०) होत असून 'तिसऱ्या इयत्तेत जाईपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त व्हावे,' या बाबीला धोरणात सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. जागतिक बँकेच्या लर्निंग पॉव्हर्टी निर्देशांकानुसार भारतात १० वर्षे वयोगटातील ७० टक्के विद्यार्थी त्यांच्या वयोमानानुसार योग्य असलेला छोटा मजकूरही वाचू किंवा समजू शकत नाहीत. त्यामुळे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान १०० टक्के विद्यार्थ्यांना अवगत व्हावे, यासाठी 'निपुण भारत' हे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू झाले. या अभियानास पाच जुलै २०२५ रोजी चार वर्षे पूर्ण झाली. मागे वळून पाहताना 'निपुण'मुळे कोविडकाळात घसरलेली गुणवत्ता आपण पूर्वपदावर तरी आणू शकलो आहोत असे 'असर'प्रमाणेच विविध अहवालांतून दिसते. परंतु, आकलनयुक्त वाचन, संख्याज्ञानापासून अजूनही बहुतांशी विद्यार्थी दूर असल्याने उद्दिष्टपूर्तीसाठी सामूहिक, कालबद्ध आणि तंत्रस्नेही प्रयत्नांची अधिक गरजही अधोरेखित होत आहे.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षण आणि मनुष्यबळाचा विकास. हेच लक्षात घेता नवीन शैक्षणिक धोरणात विविध उद्दिष्टे अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त होणे हे शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतील मूळ सूत्र. त्याशिवाय या धोरणाची परिपूर्ण अंमलबजावणी अशक्य आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांच्या साथीने पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (फाउंडेशनल लिटरसी अँड न्यूमरसी) वृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. निपुण भारत अभियान सध्या भारतातील सहा लाख शाळांतील १७ लाख शिक्षकांच्या माध्यमातून सहा कोटी मुलांसाठी राबविले जात आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीमुळे पहिल्या चार वर्षांत मुलांच्या वाचन आणि गणितीय कौशल्यांत वाढ झाल्याचे दिसते. 'असर'च्या २०२४ मधील अहवालानुसार वाचन करू शकणाऱ्या इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण हे २०२२ च्या तुलनेत २०२४ मध्ये ७.१ टक्क्यांनी वाढून २३.४ टक्के इतके झाले तर इयत्ता पाचवीतील वाचन करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ६.३ टक्क्यांनी वाढून ४४.८ टक्क्यांवर पोचले. याच जोडीला विद्यार्थ्यांच्या गणितीय कौशल्यांतही 'निपुण भारत'मुळे सकारात्मक बदल नोंदविला गेला. इयत्ता तिसरीतील बेरीज करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ७.४ टक्क्यांनी वाढले. शिवाय इयत्ता पाचवीतील भागाकार करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ५.१ टक्क्यांनी वाढल्याचे दिसले. एकीकडे ही वृद्धी दिसत असली तरी 'असर'च्या कोविडपूर्वीच्या अर्थातच २०१८ मधील सर्वेक्षणाच्या तुलनेत मात्र ती फारशी समाधानकारक नाही, हेही विसरून चालणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला निपुण करण्याचे ध्येय समोर ठेवून वाटचाल करत असताना शिक्षण विभागापुढे आलेल्या काही समस्यांचा आढावाही घेणे महत्वाचे आहे. महाराष्ट्राचा विचार करता राज्यात आजघडीला शिक्षक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी ही पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. परिणामी यंत्रणेवर अतिरिक्त ताण येतो. कित्येक शाळांमध्ये एका शिक्षकाला एकाच वेळी दोन–दोन वर्गांवर अध्यापन करावे लागते. तसेच अनेक ठिकाणी एका गटशिक्षणाधिकाऱ्यावर दोन–दोन तालुक्यांची जबाबदारी येऊन पडते. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक वर्गासाठी वर्षातून किमान २०० दिवस आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी किमान २२० दिवस अध्यापन होणे बंधनकारक आहे. परंतु, यात अशैक्षणिक कामांची वाढती जंत्रीही अडचण आणते. परिणामी शालेय शिक्षण आणि गुणवत्तेला त्याचा फटका बसतो. ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग रिपोर्ट २०२४ नुसार भारतात जिल्हास्तरावर एकत्र होणारी शैक्षणिक माहिती वापरून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करण्यात यंत्रणा कमी पडते. शाळांकडून माहिती संकलित करणे आणि ती केंद्राकडे पाठविणे, एवढाच कार्यभाग या यंत्रणेकडून साध्य होत असल्याचे निरीक्षण या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. अध्ययन स्तर मूल्यांकनातून मिळणारी माहिती हाताळणे आणि त्याचा वापर करणे यावर काम होणे अपेक्षित आहे. यासह शिक्षक आणि प्रशासकीय कामे पाहणारे अधिकारी यांच्यात अधिक समन्वय गरजेचा असून या समन्वयाच्या अभावामुळे 'निपुण भारत'ची प्रगती प्रत्यक्षात कसे होते आहे, याचे गुणात्मक मूल्यांकन होण्यात अडथळा येत असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे.

शासकीय पातळीवरील या अडचणींवर मात करत काही ठिकाणी वेगळे उपक्रम सुरू आहेत. ठाणे जिल्ह्याचे उदाहरण आपण घेतले तर जिल्हा परिषद प्रशासनांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी 'निपुण'चे उद्दिष्ट साधण्यासाठी दिशा (DIISH- : District Initiative for Improvement in Students Holistic -chievement) हा बहुआयामी उपक्रम २०२४ मध्ये सुरू केला. याद्वारे जिल्ह्यातील १ हजार ३२८ प्राथमिक शाळांमध्ये ७२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषा आणि गणितीय कौशल्यांमध्ये आमुलाग्र बदल घडवण्यात यश मिळाले. जी गोष्ट मोजली जाते तिच्यातच प्रगती होऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमतांचा स्तर मोजणे, त्या माहितीचे विश्लेषण करणे, त्यानुसार प्रकल्प आखणे आणि आपण योग्य दिशेने जातोय का? हे कळण्यासाठी सातत्याने मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. 'व्ही–स्कूल' या पद्वारे जुलै २०२४ ते एप्रिल २०२५ या काळात सरासरी ९५ टक्के विद्यार्थ्यांच्या दर महिन्यात पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान चाचण्या घेण्यात आल्या, निकालाची डिजिटल नोंद घेण्यात आली.

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर खा.बजरंग सोनवणे यांचे प्रयत्न फळाला, केजला दिले झुकते माप

बीड: पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे. केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत. केंद्राकडे पाठविले प्रस्ताव उद्दिष्टाच्या अधीन राहून ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ३००० पेक्षा अधिक आहे आणि त्यांना स्वमालकीची



ग्रामपंचायत इमारत नाही, अथवा धोकादायक व मोडकळीस आलेली आहे, अशा ग्रामपंचायतींचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिल्या होत्या. या ग्रामपंचायतींचा समावेश धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.

## केज येथीलन्यू इंटेल कॉम्प्युटर संस्थेला एमकेसीएल चा मानाचा पुरस्कार

केज/प्रतिनिधी केज शहरातील न्यू इंटेल कॉम्प्युटर एम.एस.सी.आय.टी. ची तालुक्यातील सर्वात जुनी आणि दर्जेदार संस्था असून, २०२५ या शैक्षणिक वर्षात एम.एस.सी.आय.टी. आणि 'क्लिक' या दोन्ही कोर्समध्ये मिळून संपूर्ण जिल्ह्यात सर्वाधिक प्रवेश संख्या नोंदवल्याबद्दल या संस्थेला एमकेसीएल (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) तर्फे गौरवण्यात आले.




गौरवपर पारितोषिक हे एमकेसीएल च्या विभागीय बैठकीत संस्थेचे प्राचार्य श्री. गणेश सत्वधर यांनी स्वीकारले. हे पारितोषिक एमकेसीएल चे व्यवस्थापकीय संचालक श्री. समीर पांडे सर आणि श्री. बालकिशन बलदवा सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. न्यू इंटेल कॉम्प्युटर ही संस्था गेल्या २५ वर्षांपासून गुणवत्तापूर्ण संगणक शिक्षण देण्यासाठी ओळखली जाते. या संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवले असून, केज व परिसरात संगणक शिक्षण क्षेत्रात एक विश्वासार्ह नाव निर्माण केले आहे.

## बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून द्या ;लोकशाही पत्रकार संघाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दिलेल्या निवेदनाची दखल घेत अजित पवार यांनी दुसऱ्याच दिवशी झालेल्या पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देत असताना बेघर नागरिकांसह पत्रकारांना घरकुल देणार आहोत. ज्यांना घर बांधण्यासाठी जागा नाही अशा पत्रकारांना घरासाठी जागा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.



बीड/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील शेकडो पत्रकारांनी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून देशाचे व समाजसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबीयांना राहण्यासाठी घर बांधता आले नाही. परंतु आजच्या काळात आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे या भावनेतून आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सदैव तळमळ करणाऱ्या पत्रकारांची वेदना आणि व्यथा लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ज्ञबीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या मागणीचे निवेदन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांनी दिले. बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेला मोठा इतिहास आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा माणून या जिल्ह्यातील अनेक गुणी पत्रकार तुटपुंज्या मानधनावर काम करत होते शिवाय आहेत ही जिल्ह्यातील अनेक पत्रकारांनी पत्रकारितेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य वेचले, आपल्या पत्रकारितेच्या काळात या पत्रकारांनी कुटुंबाचा किंवा आपल्या घरातील सदस्यांच्या सुखाचा विचार कधीच केला नाही. आज जिल्ह्यातील विविध दैनिकातील शेकडो पत्रकार वयोवृद्ध झाले आहेत. कित्येक पत्रकारांचे आयुष्य संपले तरीही त्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी घर बांधता आले नाही. आजच्या काळात पत्रकारांना प्लॉट खरेदी करून घर बांधणे अशक्य बाब झाली आहे. पत्रकारिता करत असताना आपल्या कुटुंबीयांचे घराचे स्वप्न पूर्ण करता यावे यासाठी ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील पत्रकारांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीचे निवेदन दिले. यावेळी अजित पवार यांनी सकारात्मकता दावून जागा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश उपाध्यक्षा हलीमा शेख, मराठवाडा कार्याध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ बीड जिल्हाध्यक्ष श्री साहस आदोडे, जिल्हा उपाध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट, जिल्हा संघटक श्री संजय कुलकर्णी यांच्या सह्या आहेत.

## १५ ऑगस्ट ' डिजिटल इंडिया फाऊंडेशन डे' जाहिर करा खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान मोंदींकडे मागणी

बीड/प्रतिनिधी भारताच्या इंटरनेट युगाला ३० वर्षे पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट हा 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' जाहीर करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचारमंत्री ज्योतिरादित्य राजे शिंदे यांच्याकडे केली आहे. बीडचे खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, भारतामध्ये सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू होऊन यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट १९९५ रोजी विदेश संचार निगम लिमिटेड मार्फत सार्वजनिक इंटरनेटचा शुभारंभ झाला होता. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचार मंत्री यांना पत्र लिहून १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून साजरा करण्याची मागणी केली आहे. सन १९८६ साली सुरु झालेली भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापारापुरती मर्यादित नव्हती, तर ती शिक्षण,संशोधन व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल होते. त्यांनी आपल्या पत्रात भारताच्या इंटरनेट प्रवासातील काही महत्त्वाचे टप्पे अधोरेखित केले आहेत: १९८६ शिक्षण व संशोधन संस्थांसाठी इंटरनेट सेवा, १९८७ जिल्हास्तरावर शासन व नियोजन संस्थांना कनेक्टव्हिटि, १९९५ सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू, १९९८ खासगी इंटरनेट कंपन्यांसाठी दरवाजे खुले, २००५ ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन, ऑनलाईन शिक्षणासाठी गती, २०१६ स्वस्त मोबाइल डेटा, युपीआय आधार या प्रणालींची निर्मिती, २०२५ तंत्रज्ञानात जागतिक नेतृत्वाची दिशा देण्याचे काम झाले आहे. आज भारताचा तरुण आयटी निर्यात, स्टार्टअप्स आणि डिजिटलीकरणाच्या बाबतीत तो जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. डिजिटल वाटचाल बाजारपेठेच्या उद्देशाने नव्हे तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन सुरू झाली होती, आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे, असेही म्हटले आहे. खा.सोनवणेंच्या महत्वाच्या मागण्या १५ ऑगस्ट २०२५ ला 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून मान्यता द्यावी. इंटरनेट, एनआयसी या संस्थांचे योगदान औपचारिकपणे गौरवावे. 'राष्ट्रीय डिजिटल संग्रहालय' स्थापन करून भारताच्या इंटरनेट प्रवासाचे दस्तऐवजीकरण करावे.

## लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

लातूर : - लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व इतर अनेक महायुतीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि ११ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.






महाराष्ट्राचे लोकनेते माजी केंद्रीय ग्रामविकासमंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा पूर्णकृती पुतळा लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्यालय इमारत परिसरात उभारण्यात आला असून शासकीय जागेत मुंडे साहेबांचा लातूर येथे बसवण्यात आलेला पुतळा कदाचित राज्यातील पहिलाच असेल अशी माहिती देऊन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भव्य दिव्य उभारण्यात आलेल्या या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण येत्या सोमवार दि ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. पुतळा अनावरणाचा जाहीर कार्यक्रम दयानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

या अनावरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले हे राहणार आहेत. तर याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्याच्या पर्यावरणमंत्री ना. पंकजाताई मुंडे, सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी कृषीमंत्री आ. धनंजयजी मुंडे, माजी युवक कल्याण व क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औश्याचे आमदार अभिमन्यू पवार, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे अध्यक्ष गोविंदअण्णा केंद्रे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजप नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेना संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्यासह महायुतीचे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळा अनावरणाचा भव्य दिव्य सोहळा होत असून या कार्यक्रमास जिल्हाभरातील भाजपासह महायुतीतील सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर मुंडे साहेबावर प्रेम करणाऱ्या सर्व स्थरातील नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असेही आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

## क्रांतीची नवी पहाट




९ ऑगस्ट क्रांतीदिनी,
एक नवा अध्याय सुरु,
बुद्धांच्या शांती मार्गावर, चला सारे एकत्र येऊ.
एक पाऊल शांती पथाने
क्रांतीचा संदेश देऊ,
नवी मुंबईच्या भूमीवर, समतेचे बीज पेरू.
लॉर्ड बुद्धा पार्कची ज्योत,
तेजोमय झाली आज,
पौर्णिमेच्या चांदण्याखाली, एकजुटीचा साज.
अंधाराच्या गर्तेतून, प्रकाशाची वाट काढू,
बाबासाहेबांचे स्वप्न,
सत्यात उतरवू.
वर्षावासाची मालिका, विहारातून सुरु आहे,
पौर्णिमेचा हा उत्सव,
नवा आनंद देई.
भेदभाव विसरून सारे, बंधुत्वाचे गीत गाऊ,
क्रांतीच्या या पाऊलांनी, शांततेची दुनिया पाहू.
हाक दिली आहे आता, समस्त बौद्ध बांधवांना,
समतेचे निशाण घेऊन, चालवूया क्रांतीच्या रथाला.
'राजानंद' च्या मार्गावर,
एक होऊया सारेजण,
क्रांतीदिनी करूया संकल्प,
एक पाऊल शांतिपथाने, क्रांतीच्या दिशेने
घडवूया आपले सुंदर जीवन.

## वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान; शेतकरीपुत्र खा.सोनवणेंनी संसदेत मांडला प्रश्न हरीण, रानडुकरांनी नुकसान केल्यास भरपाई का नाही?, शेतकऱ्यांच्या आवाज दिल्लीत पोहचविला

बीड/प्रतिनिधी बीड जिल्ह्यात हरीण, रानडुक्करे व इतर वन्य प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होत आहे. नैसर्गिक आपत्ती सोबतच जंगली प्राणी उपद्रवामुळे शेतीमालाचे नुकसान बीड जिल्ह्यातील कांही भागात मोठ्या प्रमाणात होत असते. ही चिंतेची बाब आहे. हा उपद्रव रोकण्यासाठी उपाय योजना करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतक-यांना पिकांची नुकसान भरपाई मिळत नाही. इतर राज्यांमधे हत्तीने पिकाचे नुकसान केले तर भरपाई मिळते, पण आमच्या शेतकऱ्यांना हरीण, रानडुक्कर यांनी नुकसान केल्यानंतर नुकसान भरपाई का मिळत नाही?, असा सवाल उपस्थित करत वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच हा उपद्रव रोकण्यासाठी शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. जिल्ह्यातील शेतकरीपुत्र म्हणून खा.सोनवणे यांची ओळख असून ते वारंवार शेती प्रश्नावर आवाज उठवित आहेत. कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकुर यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे, पंतप्रधान पीक विमा योजनेत नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस संरक्षण मिळते तसेच शेतीला कुंपण घालण्यासाठी राज्य सरकारे उपाययोजना करतात मात्र, जंगली प्राण्यांमुळे होणारे नुकसान हे टाळता येण्यासारखे असल्याने आधी या योजनेत त्याचा समावेश नव्हता. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विविध राज्य सरकारांच्या विनंतीनंतर, राज्य सरकारांना या नुकसानीचा 'ड-ऑन कव्हर' स्वरूपात समावेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत हा पर्याय लागू केलेला नाही. तसेच, केंद्र सरकारकडून 'डेव्हलपमेंट ऑफ वाइल्डलाईफ हॅबिटॅट्स', 'प्रोजेक्ट टायगर' आणि 'प्रोजेक्ट एलिफंट' या योजनांतर्गत राज्यांना आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये काटेरी तारांचे कुंपण, सोलार ऊर्जेवर चालणारे कुंपण, कॅक्टसची जिवंत फेन्सिंग, भिंती इत्यादींची उभारणी करून पिकांमध्ये जंगली प्राण्यांची घुसखोरी रोखण्याच्या उपायांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात हरीण, रानडुकरांमुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वन्यप्राण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, शिवाय पिक वाचविण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी खा.सोनवणे यांनी केली आहे.

अशा आहेत महत्वाच्या मागण्या

१. महाराष्ट्रात पंतप्रधान पीक विमा योजनेच्या ड-ऑन कव्हरमध्ये हरिण व रानडुकरांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा समावेश करण्यास तात्काळ मान्यता द्यावी.
२. हा पर्याय लागू झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्याबाबत योग्य ती माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते वेळेत या योजनेचा लाभ घेऊ शकतील.
३. तसेच, केंद्र व राज्य योजनांद्वारे उपलब्ध असलेल्या सोलार किंवा तारांचे कुंपण, भिंत बांधकाम इत्यादी प्रतिबंधात्मक उपायांनाही अधिक बळकटी द्यावी.

मुख्यमंत्र्यांकडेही केली मागणी

केंद्रशासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती आर्थिक सुरक्षा मिळेल आणि शेतीसंबंधी टाळता येणाऱ्या धोका घटकांपासून संरक्षण मिळेल, मात्र महाराष्ट्र राज्यातील सर्वदूर भागामधे रानडुक्कर, हरिणे तसेच इतर जंगली प्राणी याचा शेतास होत असलेल्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधे केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ड-ऑन कव्हरमधे रानडुक्करे, हरिणे व इतर जंगली प्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीचा समावेश करावा व अशा भागामधे शेतीला कुंपण घालून हा उपद्रव रोकण्यासाठी उपाययोजना करव्यात यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना खा.बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन मागणी केली आहे.

## लातूर येथे ९ ऑगस्टपासून तीन दिवसीय लोकसंगीत महोत्सवाचे आयोजन

लातूर , ०७ : राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यातील लोककला, लोकपरंपरा व लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख नव माध्यमातून व्हावी, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२५ चा लोकसंगीत महोत्सव ९ ते ११ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत लातूर येथील दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.




या महोत्सवात राज्यातील विविध गायक कलाकार व कलापथक आपली कला सादर करणार आहेत. शनिवार, ९ ऑगस्ट २०२५ रोजी रामानंद उगले, श्रावणी महाजन, विनल देशमुख, कुणाल वराळे यांच्यासह सहकलाकार हे आपली कला सादर करणार आहेत, तर रविवार, १० ऑगस्ट, २०२५ रोजी चैतन्य कुलकर्णी, आसावरी बोधनकर, प्रतीक सोळसे, अनुष्का शिकतोडे यांच्यासह सहकलाकार हे आपली कला सादर करतील. या महोत्सवाचा समारोप सोमवार, ११ ऑगस्ट, २०२५ रोजी होणार असून अपेक्षा घारे, राधा खुडे, अभिजित कोसंबी, गौरव पवार यांच्यासह सहकलाकार आपली कला सादर करणार आहेत. हा लोकसंगीत महोत्सव सर्व रसिकांसाठी विनामूल्य आहे. तरी लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक बिभिषण चवरे यांनी केले आहे.

# अतिक्रमण, वाहतूक कोंडी आणि आता प्रचंड युनिपोलचा भार लातूरकरांना असह्य.....

लातूर : लातूर शहरातील बेशिस्त वाहतूक, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक, वाढते अवैध अतिक्रमण या कारणांमुळे मुख्य रस्त्यांवर होत असलेली सततची वाहतूक कोंडी लातूरकरांना असह्य होत असतानाच आता प्रचंड आणि धोकादायक युनिपोलचा भार लातूरकरांची चिंता वाढविणारा आहे. खरंच लातूर शहराला युनिपोल ची गरज आहे का? याबाबत मनपा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा अशी विनंती माझं लातूर परिवाराने केली आहे. लातूर शहरातील वाढते अतिक्रमण, बेशिस्त वाहतूक, वाहतूक नियमांचे पालन न करणारे वाहनचालक याचे फलित म्हणजे चौका-चौकात होत असलेली वाहतूक कोंडी. यामुळे लातूरकर त्रस्त झालेले असतानाच आता शहरात मुख्य ठिकाणी रस्त्याच्या मधोमध उभे होत असलेले प्रचंड आणि धोकादायक युनिपोल नागरिकांची चिंता वाढविणारी ठरत आहेत. खासगी इमारतीवरील बेकायदा होर्डिंग्ज, जाहिराती फलक, फ्लेक्सच्या विळख्यातून मुक्त होण्यासाठी धडपडणारे लातूर शहर आता युनिपोलच्या नव्या आणि धोकादायक संकटाला सामोरे जात आहे. खरंच लातूर शहराला युनिपोलची गरज आहे का? याचा जिल्हा प्रशासन आणि महापालिका प्रशासनाने गंभीर विचार करावा असा सूर आता सर्वसामान्य नागरिकांतून निघत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून वादळी वारे, मोठा पाऊस झाला तर हे युनिपोल नागरिकांच्या जीवावर बेतू शकतात. एखादी दुर्घटना होण्याआधी ती दुर्घटना होणारच नाही यासाठी प्रशासनाने उपाययोजना आखणे अपेक्षित आहे. युनिपोलच्या माध्यमातून लाखों रुपयांचा कर जरी मनपाला मिळणार असला तरी नागरिकांची संभाव्य जीवित आणि वित्तहानी मनपाला न परवडणारी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.









जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि मनपा प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवित शहरातील अवैध अतिक्रमण, वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी त्वरीत पाऊले उचलण्याची गरज असून धोकादायक युनिपोलचे संभाव्य धोके पाहता हे युनिपोल तात्काळ हटविण्यात यावेत अशी विनंती माझं लातूर परिवाराच्या वतीने मनपा प्रशासनास करण्यात येत आहे.

## ९ आगस्ट क्रांती दिनी, ज्वेल ऑफ नवी मुंबई- लॉर्ड बुद्धा पार्क येथे पौर्णिमा साजरी करू..!

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नेरूळ नवी मुंबईतील समस्त बौद्ध-आंबेडकरी बंधू आणि भगिनींनो सविनय नमो बुद्धाय जय भीम...आपल्या सर्वांना कळविण्यात अत्यानंद होतो की, ढ्हश ईीवहळीीं ळिळशीं ष खपवळर अर्थात भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई शाखा : पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, शिक्षीका, बौद्धाचार्य आणि समता सैनिक दल तसेच नवी मुंबईतील तमाम बौद्ध - आंबेडकरी छोट्या-मोठ्या संघटना, संस्था, मंडळ यांनी संकल्पपूर्व निर्धार करून विश्व शांतीदूत तथागत भगवान गौत्तम बुद्धांच्या भव्यदिव्य मूर्तीला प्रत्येक महिन्यातील पौर्णिमेला त्रिवार वंदन करूया..! बंधू आणि भगिनींनो...सध्या प्रत्येक विहारात वर्षावास मालिका चालू आहे ते तर कंटिन्यू चालू ठेऊनच, आपल्या सर्वांच्या वतीने प्रत्येक महिन्यातील कमीत कमी पौर्णिमेचा कार्यक्रम हा लॉर्ड बुद्धा पार्क येथे साजरा केला तर समाजात एक नवचैतन्याचे वातावरण निर्माण होईल व बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित असणारा सर्व वंचित बहुजन समाज संघटीत झाल्याचे चित्र दिसेल..! त्यासाठी आपण सर्वांनी एक पाऊल शांती पथाने क्रांतीच्या दिशेने..! बाबासाहेबांचा रथ पुढे नेहुया..! २०२५ शनिवार दिनांक: ९ ऑगस्ट क्रांती दिनी पहिल्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी =१० वा. पौर्णिमा लॉर्ड बुद्धा पार्क येथे साजरी करण्यात येणार आहे, तरी नवी मुंबईतील समस्त बौद्ध - आंबेडकरी समाज बांधवांनी शुभ्र वस्त्र परिधान करून कार्यक्रम स्थळी वेळेत उपस्थित राहावे व पुढील कार्यक्रमाचे आयोजन नियोजन सर्वांच्या विचार विनिमयातून कार्यक्रमाची आखणी करावी हि आपणा सर्वांना नंम्र विनंती. या कार्यक्रमासाठी आयु. नामदेव जगताप गुरुजी ( जिल्हाध्यक्ष न.मुं. भारतीय बौद्ध महासभा ), महिला जिल्हाध्यक्ष : शोभाताई कांबळे (भा. बौ महासभा), तसेच समाजसेवक आयु. महेश खरे, आणि बौद्धाचार्य: कल्याणराव हनवते यांनी प्रसिद्धी माध्यमातून सर्वांना आवाहन केले आहे.

# शिर्डीतील साईबाबा संस्थानाच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार!

शिर्डी (प्रतिनिधी) :- जगातील कोट्यवधी भाविक भक्तांचे आराध्य दैवत असलेल्या शिर्डीतील साईबाबांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेण्याचा मान दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि दैनिक समर्थ गांवकरी चे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर व पत्रकार पंढरीनाथ पगार यांना नुकताच लाभला. भाविकतेने ओथंबलेल्या वातावरणात झालेल्या या भेटीत साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी समाधीस्थळाचा पवित्र अनुभव घेतला. या भेटीच्या निमित्ताने शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी डॉ. विश्वासराव आरोटे आणि संजय फुलसुंदर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. या सन्मानाने उपस्थित भाविकांसह पत्रकार बांधवांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.




कार्यक्रमादरम्यान गोरक्ष गाडीलकर यांनी दैनिक समर्थ गांवकरी या वर्तमानपत्राच्या प्रामाणिक, निर्भीड आणि लोकहितार्थ पत्रकारितेची प्रशंसा केली. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्यातील पत्रकार संघटनांच्या बळकटीकरणासाठी, तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच, संजय फुलसुंदर यांनी प्रशासनिक व व्यवस्थापन क्षेत्रात दिलेल्या योगदानाचीही दखल घेण्यात आली. साईबाबांच्या दर्शनानंतर झालेल्या या सत्कार सोहळ्यात श्रद्धा, सबुरी आणि सेवाभावाचा संदेश जणू प्रत्यक्ष अनुभूतीस आला. उपस्थितांनी या प्रसंगाचे स्मरणीय क्षण छायाचित्रांत कैद करत, समाधीस्थळाच्या आध्यात्मिक वातावरणात मन:शांतीचा अनुभव घेतला. सत्कार कार्यक्रमामुळे साईभक्त आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांमध्ये परस्पर आदर, प्रेरणा आणि समाजसेवेचा नवा संकल्प जागृत झाला.

## रेणापुर येथील मारहाण प्रकरणातील आरोपीतांना तीन महिन्याच्या कारावासाची शिक्षा

रेणापूर :- रेणापुर येथील मारहाण प्रकरणातील आरोपीतांना तीन महिन्याच्या कारावासाची शिक्षा. याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस ठाणे रेणापूर हद्दीत प्रॉपर रेणापुर येथे दिनांक ९ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ०८.३० वाजता चे सुमारास घराशेजारी असलेल्या उकंड्यावर कचरा टाकण्याच्या कारणावरून आरोपीतांनी मिळून फिर्यादीस काठीने मारहाण करून शिवीगाळ केली होती त्यावरून पोलीस ठाणे रेणापूर येथे गु.र.नं:७४/२०२० कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवी मधील आरोपी नामे १) राधिका सूर्यकांत गिरी, वय ३५ वर्ष २) सूर्यकांत तुकाराम गिरी, वय ३० वर्ष ३) तुकाराम रतन गिरी वय ६८ वर्ष ,सर्व राहणार कामखेडा तालुका रेणापूर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता तत्कालीन पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांचे मार्गदर्शनात पोलीस हेडकॉन्स्टेबल ऊस्तुर्गे यांनी सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून नमूद गुन्ह्यात आरोपी विरुद्ध भरपूर पुरावे जमा करून दोषारोपपत्र मा.न्यायालयात पाठविण्यात आले होते.

त्यावर वरिष्ठांचे व सध्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांचे मार्गदर्शनात कोर्ट अंमलदार कांदे यांनी वेळोवेळी न्यायालयीन प्रक्रियेच्या पाठपुरावा केला. सरकारी अभियोक्ता व्ही. सी. मुरळीकर यांनी सरकारतर्फे बाजू मांडली. नमूद गुन्ह्यात आरोपी विरुद्ध सबळ पुरावे उपलब्ध झाल्याने मा. न्यायालय प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,कोर्ट नंबर २, रेणापूर चे न्यायाधीश डी. एम. गीते यांनी दिनांक ०६ ऑगस्ट रोजी नमूद आरोपींना कलम ३२४ भादवी मध्ये प्रत्येक आरोपीस तीन महिन्याचा साधा कारावासाची शिक्षा व कलम ३२३ भादवी मध्ये प्रत्येक आरोपीस तीन महिन्याचा साधा करावासाची शिक्षा दिली आहे.

# संभाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धांत यश

मुरुड/ महेंद्र आल्टे : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतर -महाविद्यालयीन 'अ 'विभागीय बुद्धिबळ (पुरुष )स्पर्धा दिनांक २३ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर लातूर जिल्हास्तरीय अंतर-महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेमध्ये एकूण १४ संघाने सहभाग नोंदवला. स्पर्धेमधील प्रत्येक संघास ४ प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध मॅच खेळावी लागली. पहिल्या फेरीत संभाजी महाविद्यालय व बसवेश्वर महाविद्यालय यांच्यामध्ये मॅच होऊन १-३ गुण संपादन केले. दुसऱ्या



फेरीमध्ये संभाजी महाविद्यालय व शिवलिंगेश्वर फार्मसी महाविद्यालय आलमला यांच्यामध्ये मॅच होऊन १-३ गुणाच्या फरकाने विजय संपादन केला. तिसऱ्या फेरीमध्ये संभाजी महाविद्यालय व दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूर यांच्यामध्ये सामना होऊन २-२ गुणाच्या फरकाने विजय संपादन केला. चौथ्या व अंतिम फेरीमध्ये संभाजी महाविद्यालय व श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा यांच्यामध्ये सामना होऊन ३-१ गुणाच्या फरकाने विजय संपादन केला. स्पर्धेमध्ये ७ गुणांची कमाई करून महाविद्यालयाच्या संघास सातवे स्थान प्राप्त झाले.महाविद्यालयाच्या बुद्धिबळ संघामध्ये १) तनमोर सुमित हनुमंत एम.कॉम. भाग-१ २) पानखडे यशवंत जयसिंग बी.एस्सी. भाग -२, ३) मुळे चैतन्य शिवाजी बी.कॉम. भाग -२, ४) कसपटे विजय महादेव बी.एस्सी. भाग -२ यांनी सहभाग नोंदवला.सुमित हनुमंत तनमोर या खेळाडूने सात फेऱ्यांमध्ये अपराजित राहून लातूर जिल्हा संघामध्ये स्थान पटकावले. त्यामुळे त्याची निवड अंतर महाविद्यालयीन अंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठीच्या मार्गदर्शन व सराव शिबिरासाठी झाली. सदर शिबिर दिनांक २५ ते ३१ जुलै २०२५ दरम्यान शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी येथे संपन्न होणार असून दिनांक १ व २ ऑगस्ट रोजी सदर संघ अंतर महाविद्यालयीन अंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी शिवाजी महाविद्यालय कंधार येथे रवाना होणार आहे.संघातील खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा.मधुकर क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम, संस्थेचे अध्यक्ष श्री बी. एस दादा पटाडे, संस्थेचे सचिव श्री. विजय पाटील यांनी खेळाडूचे अभिनंदन केले.

# दोन दिवशीय सहकार प्रशिक्षण संपन्न

लातूर -: महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म पुणे, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा. जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था लातूर यांचे विद्यमाने लातूर येथे पतसंस्था संचालक, कर्मचारी प्रशिक्षण घेण्यात आले.

दोन दिवशीय प्रशिक्षणात मोहन जाधव, निवृत्त बँक अधिकारी,लातूर, एस.आर. कोळे, उप प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर ड. सुनिल कांबळे, चेअरमन डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्था, लातूर, रविंद्र हरबडे प्रमाणीत लेखा परीक्षक सहकारी संस्था लातूर यांनी योग्य कर्ज वाटप, वसूली संबंधी कायद्यातील तरतुदी, नियामक मंडळ, शासकीय परिपत्रके ,नफा विभागणी सहकारी संस्था सभा वृतांत इत्यादी विषयावर माहिती मार्गदर्शन चर्चा करण्यात आली.

समारोप प्रसंगी रविंद्र हरबडे, प्रमाणीत लेखा परीक्षक यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्र संचलनएस. आर. कोळे, उप प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.



## हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड आणि महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी मानले आभार

केज/प्रतिनिधी केज शहरातील बीड रोडवरील अनिल भोजनालयाच्या समोर लाईटची नवीन डीपी बसवल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड आणि महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरात सतत लाईटचा तुटवडा भासत असून नागरिकांना लाईट साठी अनेक गोष्टीचा सामना करावा लागत आहे व अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. केज शहराची वाढती लोकसंख्या व व्याप्ती पाहून महावितरण कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाने केज शहरांमध्ये काही नवीन डीपी दिल्या आहेत. परंतु डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे महावितरण कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांना अडचण निर्माण होत आहे. काही नागरिकांनी ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या समवेत संपर्क करून नवीन डीपी बसवण्यासाठी जागेचा प्रश्न मांडला व नवीन डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी केली असता, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी तात्काळ जागेचा प्रश्न मार्गी लावून केज शहरातील अनिल भोजनालयाच्या समोर नवीन डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली व त्या ठिकाणी नवीन डीपी बसवण्यात आली आहे. त्याकरिता सीताताई बनसोड,हारुणभाई इनामदार व महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी आभार व्यक्त केले.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE